# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/11/2022 (शुक्रवार) दुपार

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील आबेडकर चौक, कन्हान येथे दिनांक १७/११/२०२२ चे १९.३० वा. १९.४० वा. दरम्यान फिर्यादी नामे– पोलीस शिपाई वैभव ज्ञानेश्वर बोरबल्ले, वय ३० वर्ष, रा. गणेश नगर,कन्हान, ता.पारशिवनी, जि. नागपुर व पोलीस शिपाई सम्राट वनपती, ब. नं. १११ नेमणुक पोलीस स्टेशन कन्हान यांना गुन्ह्यातील 'पाहिजे आरोपी' बाबत मुखबीर कडुन गुप्त माहिती मिळाल्याने नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपी नामे– १) गौरव उर्फ तेनाली राजु राऊत, वय १६ वर्ष, रा. अशोक नगर, कन्हान २) प्रशांत सार्वे, वय २१ वर्ष, रा. कन्हान यांचा शोध घेत असता दिसुन आल्याने आरोपीतांना पकडण्याकरीता फिर्यादी व पोलीस शिपाई सम्राट वनपती, ब. नं. १११ यांनी पुढे होवुन आरोपी तेनालीला फिर्यादीने पकडताच त्याच्या सोबत आरोपी नामे– प्रशांत सार्वे याने तेनालीला फिर्यादीच्या हातातुन सोडविण्याचा प्रयत्न केला व त्याच वेळी आरोपी तेनाली याने त्याच्या खिशातील चाकु काढुन फिर्यादीच्या पोटावर वार करण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीने डावा हात समोर करुन त्याचा वार रोखला तसाच त्याने फिर्यादी पोलीस शिपाई यावर चाकुचा दुसरा वार केला असता फिर्यादीने पोलीस शिपाई याने त्याच्या डाव्या हाताने आरोपीच्या हातातील चाकु पकडण्याचा प्रयत्न केला तेव्हा आरोपीच्या हातातील चाकुने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या पंज्याचा करंगळीच्या मागील बाजुस जखम होऊन रक्त वाहु लागले. फिर्यादीला जखम झालेली पाहुन आरोपी तेनाली याने तो चाकु आपल्या उजव्या हाताने आपल्या डाव्या हाताच्या मनगटावर मारल्याने त्याचा डावा हात आतील बाजुने कापला गेला. तेवढ्यातच फिर्यादी पोलीस शिपाई व पोलीस शिपाई सम्राट याने आरोपीला पकडुन त्याच्या हातातील चाकु काढुन त्याला पकडताच फिर्यादी सोबत असलेल्या पोलीस हवालदार ६८९, पोलीस हवालदार २९८, पोलीस शिपाई २२७ यांनी आरोपी क्र. ०२) प्रशांत सार्वे याला पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु तो पळुन गेला. फिर्यादी पोलीस शिपाई याच्या डाव्या हाताला झालेल्या जखमेतुन रक्तस्त्राव होत असल्याने व आरोपी तेनालीने स्वत:च्या हातावर चाकुने मारल्याने त्याच्या हातातुन खुप रक्तस्त्राव होत असल्याने लगेच पोलीस स्टाफसह सरकारी वाहनाने उपजिल्हा रुग्णालय, कामठी येथे पुढील उपचाराकरीता जावुन उपचार केला. तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी फिर्यादी पोलीस शिपाई व आरोपी तेनाली याला पुढील उपचारकरीता मेयो हाँस्पीटल, नागपुर रेफर केल्याने त्यांच्यावर उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द ३५३, ३०७, ३४ भा.दं.वि. सहकलम ४, २५, २७, भा. ह. का. सहकलम १३५ म. पो. का. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहे.

# घरफोडी

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत वार्ड क्र. ४, गिरीसंकुल एन. के. बार च्या मागे सावनेर येथे दिनांक १६/११/२०२२ ते चे ०९.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रामचंद्र लक्ष्मण वरठी, वय ५२ वर्षे, रा. वार्ड क्र. ४, गिरीसंकुल एन. के. बार च्या मागे सावनेर हा आपले राहते घराला कुलुप लावुन पत्नीसह शेतात पानउबाळी येथे कामा करीता गेला असता संध्याकाळी शेतातील काम आटपुन भाचीचे लग्न काढण्याकरीता काटोल येथे रात्री मुक्काम करून दिनांक १७/११/२०२२ रोजी पत्नी सह पुन्हा शेतात कामा करीता आले असता संध्याकाळी ०५.०० ते ०६.०० वा. दरम्यान घरी परत आल्यावर त्याचे घरासमोरील लोंखडी गेट आणि घरासमोरील दाराला लावलेले कुलुप तोडुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने वरील नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादीचे घरात आत प्रवेश करून घरात असलेल्या लोंखडी आलमारीचे लॉकर तोंडुन त्यामध्ये फिर्यादीचे पत्नीने ठेवलेले एक सोन्याची जुनी पोत वजन १० गॅम किंमती अंदाजे १००००/— रू तसेच एक सोन्याची जुनी गोफ वजन अंदाजे १० गॅम किंमती अंदाजे १००००/— रू. व एक जुनी सोन्याची अंगठी वजन अंदाजे ०५ ग्रॅम किंमती अंदाजे ५०००/— रू. असा एकुण २५०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन सावनेर करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर